आवक क्र.-ओ/H.A.S/२०२५/०५२ दि २८-११-२०२५

# उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको

यांचे कार्यालय

शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत

बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, पाचवा मजला, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई

ईमेल- dyregcidco@gmail.com

जा. क्र. उनि/ससं/सिडको/३४८४/२०२५ दिनांक:- १०/११/२०२५

प्रति,
अध्यक्ष/सचिव
ओमकार को.ऑप.हौ.सो.लि,
भुखंड क्र. ०३, सेक्टर- १५,
वाशी, नवी मुंबई

विषय- समितीमधील इतर मागास वर्ग हे रिक्त असलेले पद व्यवस्थापन समितीव्दारे भरण्याकरीता प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत.

संदर्भ- आपले दि. ३०/०९/२०२५ रोजी या कार्यालयात प्राप्त झालेले पत्र.

आपले लक्ष उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्राकडे वेधण्यात येत आहे.

२/- उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपण या कार्यालयास कळविले आहे की, आपल्या संस्थेच्या व्यवस्थापन समितीमधील इतर मागास वर्ग हे पद रिक्त असुन ते रिक्त असलेले पद भरण्यासाठी अध्यासी अधिकारी यांची नेमणुक करावी, अशी या कार्यालयाकडे विनंती केली आहे.

सदरची निवड ही निवडणूक नियम २०१४ नुसार या कार्यालयाच्या अधिकारकक्षेत येत असल्याने या कार्यालयाने अध्यासी अधिकाऱ्याची नेमणूक करावयाची आहे. संस्थेला रिक्त असलेले इतर मागास वर्ग हे पद व्यवस्थापन समितीमधुन भरण्यासाठी मान्यता देण्यात येत असुन सदर पद भरण्याची कार्यवाही करण्याकरीता या कार्यालयाकडुन ॲड. अंकित वाळू म्हात्रे, (पॅनल नं. १५७) यांची अध्यासी अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यांत येत आहे. तसेच आपणांस कळविण्यांत येते की, अध्यासी अधिकारी यांचे मानधन संस्थेच्या निधीतुन अदा करण्यांत यावे.

(प्रताप पाटील)
उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको
नवी मुंबई

प्रत,
ॲड. अंकित वाळू म्हात्रे, (पॅनल नं. १५७) अध्यासी अधिकारी

२/- यांना सुचित करण्यात येते की, ओमकार को.ऑप.हौ.सो.लि., भुखंड क्र. ०३, सेक्टर- १५, वाशी, नवी मुंबई या संस्थेमधील रिक्त पद भरण्यासाठी कार्यकारणी मंडळाची सभा आयोजित करावी. सदर प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.

उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको
नवी मुंबई

संदेश के. शेनोय
९८१९७८७६०१

शिवाजी घराडे (सदस्य)
९८९२८३११०९

Scanned with CamScanner

अध्या.अ/ओमकार/२०२५/०८४ दि.२८.११.२०२५

# नोटीस

**अध्यासी अधिकारी यांचे कार्यालय ओमकार को ऑप हौ सोसायटी लि, भूखंड क्र.०३, सेक्टर -१५, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.**

मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (सिडको) यांच्याकडील आदेश जा.क्र.उनि/ससं/सिडको/३४८४/२०२५ दिनांक: १०/११/२०२५ या आदेशानुसार निवडणूक कार्यक्रम मी, **ॲड.अंकित बाळू म्हात्रे, अध्यासी अधिकारी** जाहीर करीत आहे. सदर कार्यक्रमातील विविध टप्पे, संबंधित संस्थेच्या मतदार संघ अथवा मतदार संघानुसार सोबत जोडलेल्या अनुसुचीप्रमाणे जाहीर करीत आहे.

ओमकार को ऑप हौ सोसायटी लि, भूखंड क्र. ०३, सेक्टर -१५, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते कि,आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील इतर मागसवर्गीय या प्रवर्गातील/मतदारसंघातील संचालक/संचालकांच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली **दिनांक ०७/१२/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता** सोसायटी ऑफिस या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे, सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत नैमित्तिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

## निवडणूक कार्यक्रम

| अ.क्र | मतदार संघाचे नाव | १. इतर मागसवर्गीय - ०१ |
|---|---|---|
| १ | | **एकूण - ०१** |
| २ | निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे | दि. २९/११/२०२५ सकाळी १०:०० वा. संस्थेचे कार्यालय/ नोटीस बोर्ड |
| ३ | नामनिर्देशन पत्रे वाटप व दाखल करण्यासाठी तारीख व वेळ ज्या जागी नामनिर्देशन पत्रे मिळतील ती जागा | दि. ०७/१२/२०२५ सकाळी १०:०० वा. ते सकाळी ११:०० वाजेपर्यंत संस्थेचे कार्यालय |
| ४ | नामनिर्देशन पत्राच्या छाननी साठी वेळ व स्थळ | सकाळी ११:०० वा. ते सकाळी ११:३० संस्थेचे कार्यालय |
| ५ | विधी ग्राह्य नामनिर्देशनांची यादी प्रसिद्ध करण्याची वेळ व स्थळ | दुपारी १२:०० वा. |
| ६ | नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याची वेळ व स्थळ | दुपारी १२:०० वा. ते दुपारी १२:३० वाजेपर्यंत संस्थेचे कार्यालय |
| ७ | अंतिम विधी ग्राह्य नामनिर्देशनांची यादी प्रसिद्ध करण्याची वेळ व स्थळ | दुपारी १२:३० वा. संस्थेचे कार्यालय |
| ८ | मतदान प्रक्रिया | दुपारी १२:३० वा . ते दुपारी ०१:०० वाजेपर्यंत |
| ९ | मत मोजणीची प्रक्रिया वेळ व स्थळ | दुपारी ०१:०० वा . ते दुपारी ०१:३० वाजेपर्यंत |
| १० | निवडून आलेल्या पदाधिकाऱ्याबाबत निकाल घोषित करणे. | दुपारी ०१:३० वाजता |

**टीप: निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.**

ठिकाण :- वाशी
दिनांक :- २९/११/२०२५

**(ॲड.अंकित बाळू म्हात्रे )**
अध्यासी अधिकारी

प्रत,
१) अडसुळे संजय बाबुराव
२) भालेराव प्रताप राजाराम
३) जाधव मंगेश अनंत
४) मोरे आनंद चंद्रकांत
५) मोरे विश्वास बाबाजी
६) रेणोसे संदेश केशव
७) तावडे सुनील धोंडू
८) उमदीकर सिद्धप्पा भीमाशंकर
९) पाटील अमृता उमेश
१०) पाडावे स्मिता सीताराम
११) धराडे शिवराम बाजीराव
१२) बापार्डेकर सुरेंद्रनाथ जनार्दन

**प्रत माहितीस्तव सादर :**
मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (सिडको)

# महत्वाच्या सूचना

१. **नामनिर्देशन पत्र दिनांक ०७/१२/२०२५ रोजी (सकाळी १०:०० ते सकाळी ११:०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होतील व स्वीकारले जातील.)**

२. **निवडणूक अनामत रक्कम रुपये ५००/- राहील.**

३. नामनिर्देशन पत्र स्वत: उमेदवार अथवा नाव सुचविणार-या व्यक्तीने अध्यासी अधिकारी यांच्याकडे दाखल केले पाहिजे.

४. नामनिर्देशन पत्राचे कोरे नमुने निवडणूक कार्यालयातून निवडणूक कार्यक्रमानुसार प्राप्त करून घेता येतील.

५. संपूर्ण तपशिलासह भरलेली नामनिर्देशन पत्रे निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवाराकडून किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या प्रतिनिधींकडून दिली व स्वीकारले जातील. यासाठी सादर पत्राची पोहोच दिली जाईल.

६. **नामनिर्देशन पत्रे कोणत्या जागेसाठी प्रवर्गासाठी ( इतर मागसवर्गीय मतदारसंघ ) भरण्यात आले बाबतचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.**

७. नामनिर्देशन पत्रावर सह्या करणारे उमेदवारांचे सूचक व अनुमोदक व्यवस्थापक समिती सदस्य सभेस हजर राहणे आवश्यक आहे.

८. उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवाराने निवडणूक प्राधिकरणाने दि. २०/१०/२०१४ चे परिपत्रकान्वये निच्छित केलेल्या आदर्श आचार साहितेचे पालन करणे आवश्यक आहे.

९. निवडणूक ठरविलेल्या कार्यक्रमानुसार घेतली जाईल, त्यात अपरिहार्य कारणामुळे बदल करणे आवश्यक असल्यास त्याची सूचना संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

१०. नामनिर्देशित पत्राच्या छाननीचे वेळी व मतमोजणीचे वेळी स्वत: उमेदवार किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या व्यवस्थापक समिती सदस्य उपस्थित राहता येईल.

११. निर्वाचन अधिकाऱ्याने मान्य केलेल्या निवडणूक चीन्हापैकी कोणतेही चिन्ह उमेदवारास मिळू शकेल. निवडणूक चिन्ह हे नामनिर्देशन पत्र /अर्ज ज्यांचे प्रथम आले असेल त्यास पसंती क्रमानुसार दिले जाईल. निर्वाचन अधिकाऱ्याचा याबाबत निर्णय अंतिम असेल.

१२. मतदानाचे वेळी व्यवस्थापक समिती सदस्यांनी आपली ओळख पडताळणीसाठी महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकरण यांनी निच्छित केलेले ओळखपत्र किंवा आधारकार्ड,पॅनकार्ड सोबत आणने आवश्यक आहे.

१३. मतमोजणी नंतर मताच्या कार्यक्रमानुसार माहिती जाहीर करण्यात येईल. निवडणुकीचा निकाल निर्वाचन अधिकार्याने सहीने नंतर जाहीर करण्यात येईल.

१४. उपविधीतील व कायद्यातील तरतुदीनुसार पात्रता व अपात्रते विषयीचे निकष सर्वांना लागू राहतील.

ठिकाण :- वाशी
दिनांक :- २९/११/२०२५

(निवडणूक निर्णय अधिकारी — ॲड. अंकित बाळू म्हात्रे)

Abhatre

**(ॲड.अंकित बाळू म्हात्रे )**
अध्यासी अधिकारी

# ओमकार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

नोंदणी क्रमांक : एन.बी.ओ.एम/सिडको/एच एस जी/(टी.सी)/१०२००/डी.आर/सन २०२३-२०२४

भूखंड क्र. ०३, सेक्टर १५, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

Inward No. Omkar/2025/050

दिनांक:०७/१२/२०२५

## विशेष सभेचे इतिवृत्त

ओमकार को ऑप हौ सोसायटी लि, भूखंड क्र.०३, सेक्टर -१५, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. या संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर समिती सदस्यामधून पदाधिकारी निवड करणेबाबत मा. उपनिबंधक सहकारी संस्था,सिडको यांच्याकडील आदेश जा.क्र.उनि/ससं/सिडको/३४८४/२०२५ दिनांक: १०/११/२०२५ रोजीच्या आदेशानुसार मी, **ॲड.अंकित बाळू म्हात्रे, अध्यासी अधिकारी** यांचे दिनांक २९/११/२०२५ रोजीच्या सभा नोटीसप्रमाणे आज दिनांक ०७/१२/२०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता संस्थेच्या कार्यालयामध्ये विशेष सभा आयोजित करण्यात आली. सदर सभेस खालील संस्थेचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार आणि व्यवस्थापक समिती सदस्य उपस्थित आहेत.

| अ .क्र (१) | उमेदवाराचे नाव (२) | पत्ता/ रूम नं. (३) | स्वाक्षरी (४) |
|---|---|---|---|
| १ | मोरे विश्वास बाबाजी (अध्यक्ष) | ११/२/४ | |
| २ | रेणोसे संदेश केशव (सचिव) | १६/३/४ | |
| ३ | अडसुळे संजय बाबुराव (खजिनदार) | १४/०/३ | |
| ४ | भालेराव प्रताप राजाराम | १५/३/४ | |
| ५ | जाधव मंगेश अनंत | १३/३/४ | |
| ६ | मोरे आनंद चंद्रकांत | १७/२/४ | |
| ७ | तावडे सुनील धोंडू | १५/२/३ | |
| ८ | उमदीकर सिद्धप्पा भीमाशंकर | २०/०/४ | S umadkar |
| ९ | पाटील अमृता उमेश | १०/०/३ | |
| १० | पाडावे स्मिता सीताराम | ११/१/२ | Mrs. Padave |
| ११ | धराडे शिवराम बाजीराव | १५/३/१ | Dharade |
| १२ | बापार्डेकर सुरेंद्रनाथ जनार्दन | १९/३/१ | |

OMKAR CO-OP. HSG. SOC. LTD. Reg. No. NBOM/CIDCO/HSG(TC)/10200/DR/2023-24 VASHI

निवडणूक निर्णय अधिकारी ॲड अंकित बाळू म्हात्रे

1

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | ॲड.अंकित बाळू म्हात्रे | अध्यासी अधिकारी | (signature) |

सदर सभा दिनांक ०७/१२/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता सुरु करण्यात येऊन नोटीशीच्या विशेष सूची प्रमाणे कामकाज करण्यात आले व संस्थेचे व्यवस्थापक समितीमधील खालील सभासदांची त्याच्या नावापुढे नमूद पदाधिकारी म्हणून निवड करीत असल्याचा खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

१. **<u>सोसायटीच्या व्यवस्थापक समिती सदस्य इतर मागासवर्गीय मतदारसंघ पदासाठी निवड करणे बाबत.</u>**

ठराव - सन २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीसाठी सोसायटी व्यवस्थापक समिती सदस्य इतर मागासवर्गीय मतदारसंघ पदासाठी श्री.लवू रामचंद्र भोवर व श्री. ज्योतिराम शिवाजी जाधव (सहयोगी सभासद) यांचे नाव व्यवस्थापक समिती सदस्यांकडून सुचवण्यात आले. सदरील उमेदवारांचे एका इतर मागासवर्गीय मतदारसंघ पदासाठी दोन उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यात आले होते, त्यानंतर अर्जाची छाननी करण्यात आली छाननी मध्ये इतर मागासवर्गीय मतदारसंघातील दोन्ही उमेदवारांचे अर्ज मंजूर झाले यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कालावधीत दोन्ही उमेदवाराकडून फॉर्म मागे घेण्यात आला नाही. निवडणूक कार्यक्रमानुसार श्री.लवू रामचंद्र भोवर व श्री. ज्योतिराम शिवाजी जाधव (सहयोगी सभासद) या दोन उमेदवारांमध्ये व्यवस्थापक समिती सदस्यांकडून गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक होऊन श्री.लवू रामचंद्र भोवर यांना ९ मते मिळाली व व श्री. ज्योतिराम शिवाजी जाधव (सहयोगी सभासद) यांना ३ मते मिळाली त्याप्रमाणे **श्री. लवू रामचंद्र भोवर** यास बहुमताने विजयी घोषित करण्यात आले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर.

सदर व्यवस्थापक समितीवर इतर मागासवर्गीय मतदारसंघ मतदार संघामध्ये व्यवस्थापक समिती सदस्यांकडून गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक झाली असे मी प्रमाणित करतो कि, वरील सभासद सहकारी संस्थेच्या वर नमूद केलेल्या इतर मागासवर्गीय मतदारसंघातून व्यवस्थापक समितीच्या त्या जागेवर निवडून आलेले आहेत. वरीलप्रमाणे सभेमध्ये कामकाज होऊन सभा संपल्याचे अध्यासी अधिकारी यांनी जाहीर केले

ठिकाण :- वाशी
दिनांक :- ०७/१२/२०२५

निवडणूक निर्णय अधिकारी ॲड अंकित बाळू म्हात्रे

(Stamp: OMKAR CO-OP. HSG. SOC. LTD. — Reg. No. NBOM/CIDCO/HSG(TC)/10200/DR/2023-24 — VASHI)

(signature)

ॲड अंकित बाळू म्हात्रे
निवडणूक निर्णय अधिकारी

2